ePaper

**असदुद्दीन ओवैसींना मोठा धक्का! काँग्रेसने युती करण्यास दिला नकार!**

| वर्ष - 8 | अंक - 337 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- एकदा मूर्ख बनवता आलं असतं!
- कसोटी गमावली अन् टेन्शन वाढलं!
- नेहरू यांनी भारताला उभे केले !
- मुलांना खासगी शाळेत पाठवणं थांबवा


www.mahaenews.com | बुधवार, दि. 16 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## कॅबिनेटमध्ये होणार फेरफार आणि फेरबदल : अनेक मंत्र्यांचे पत्ते कट होणार !

# फडणवीस यांचेही धक्कातंत्र?

## अनेक बड्या मंत्र्यांना जोरदार फटका : नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता!

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच धक्कातंत्राचा वापर करणार असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात लवकरच फेरफार आणि फेरबदल होण्याची शक्यता त्यांच्या निकटवर्तीयांनी वर्तवली आहे. यामध्ये अनेक मंत्र्यांचे पत्ते कट होणार असून, एकीकडे बड्या मंत्र्यांना फटका बसणार असताना नव्या चेहऱ्यांना देखील संधी मिळणार आहे.**

### अधिवेशनानंतर फेरबदल शक्य

सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनानंतर फडणवीस हे काही कठोर निर्णय घेण्याची शक्यता असून अनेक मंत्र्यांना खुर्ची सोडावी लागणार आहे. ते आपल्या मंत्रिमंडळात लवकरच फेरफार तसेच फेरबदलही करणार असल्याचे समजते.

### धक्कातंत्र भाजपासाठी का इतरांसाठीसुद्धा!

फडणवीस यांचे हे धक्कातंत्र फक्त त्यांच्याच म्हणजे भारतीय जनता पार्टीच्या मंत्र्यांपुरते मर्यादित असेल की उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसाठीही असेल याचीही चर्चा रंगली आहे. राजकीय विश्लेषक देखील त्याचा अंदाज वर्तवत आहेत.

### राजकारणाकडे लक्ष

फडणवीस यांचा हा निर्णय भल्याभल्यांना अचंबित करणारा असल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. फेरफार किंवा फेरबदल करताना फडणवीस हे कोणता निकष लावतात हे देखील महत्त्वाचे ठरणार आहे.

### भाजपाच्या डावपेचांचा तो एक भाग..

राजकारणामध्ये एखादी अनपेक्षित खेळी अशी खेळायची की त्यामुळे संपूर्ण भारत अचंबित झाला पाहिजे हे भारतीय जनता पक्षाच्या डावपेचांचा एक भाग आहे. पूर्वी राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि हरियाणा येथील मुख्यमंत्री नेतांना अशीच खेळी भाजपाने करून संपूर्ण देशाला अवाक् करून टाकले होते.

### अनाकलनीय, धक्कादायक खेळी!

पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच धक्कादायक अशी सर्वात मोठी बातमी समोर आली. लवकरच फडणवीस धक्कातंत्राचा वापर करण्याची शक्यता विधिमंडळ परिसरात अनेकांनी बोलून दाखवली. मुख्य म्हणजे या धक्कातंत्राचा अनेक बड्या मंत्र्यांना फटका बसण्याची शक्यता आहे. या फेरबदल्याच्या संकेतानुसार अनेक बड्या मंत्र्यांना आपली खुर्ची गमवावी लागणार आहे. तर अनेक नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता सूत्रांकडून वर्तवली जात आहे.

### शिंदे, पवारांनाही फटका..

हे धक्का तंत्र फक्त भाजपच्या मंत्र्यांपुरतं मर्यादित असेलच असे नाही तर त्याचा फटका शिवसेना आणि राष्ट्रवादीलाही बसेल याचीही खमंग चर्चा सगळीकडे सुरू आहे. राज्याच्या राजकारणाकडे अवघ्या देशाचे लक्ष लागले आहे.

### घडामोडींवर दिल्लीश्वरांचे लक्ष..

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे अगदी बारकाईने लक्ष आहे. एकनाथ शिंदे यांना त्याच पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात दिल्लीला बोलावून घेतले गेले होते याचा उलगडा आता होत आहे. या घडामोडी आता अंतिम टप्प्यात आल्या असून त्या अनुषंगाने कॅबिनेटमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता सूत्रांकडून वर्तवली जात आहे.

### गोगावले, शिरसाट, भुमरे, गायकवाड यांची चर्चा..

एकनाथ शिंदे गटाचे भरत गोगावले, संजय शिरसाट, संदिपान भुमरे आणि संजय गायकवाड तसेच अजित पवार गटाचे धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे, दत्ता भरणे, छगन भुजबळ यांची वागणूक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुळीच आवडलेली नाही. वारंवार सूचना देऊ नये बेछूट आणि बेलगाम वर्तणूक सुरू आहे, त्यांच्यावर वचक बसावा म्हणून देखील फेरबदलाचे वारे वाहू लागले आहेत की काय, अशी काहींना शंका येत आहे..

### इतर पक्षांवरही लक्ष आणि निर्णय?

आणखी एका वृत्तानुसार काही इतर पक्षातील दिग्गजांना पक्षात घेऊन मग त्यांना मंत्रिमंडळात घेऊन मंत्रिपद दिले जाईल, असे बोलले जात आहे. शिवाय,अनेक विद्यमान मंत्री घरी बसतील, खांदेपालट होईल, नव्या मंडळींना कॅबिनेटमध्ये संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच यामुळे अनेक मंत्र्यांना प्रचंड मानसिक धक्का बसणार असल्याचे बोलले जात आहे.

### 'महायुती' मध्ये प्रचंड तणाव...

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात घडत असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा संभाव्य मंत्रिमंडळ विस्तार अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

# आपला दवाखान्याचे 'सरकारी दुखणे'!

## पुण्यात केवळ एकच सुरू; राज्य सरकारकडे प्रस्ताव प्रलंबित

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यातील कष्टकरी आणि मोलमजुरी करणाऱ्या वर्गाला आरोग्य सेवा देण्याच्या उद्देशाने 'आपला दवाखाना' ही योजना सुरू करण्यात आली. या वर्गाला डोळ्यासमोर ठेवून आपला दवाखान्याची वेळ दुपारी २ ते रात्री १० ठेवण्यात आली. पुण्यात महापालिकेकडून २५ आपला दवाखाने सुरू केले जाणार होते. प्रत्यक्षात केवळ एकच दवाखाना सुरू झाला असून, इतर दवाखाने सुरू होण्यात सरकारी लालफितीचा अडसर निर्माण झाला आहे.**




सार्वजनिक आरोग्य विभागाने 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' ही योजना सुरू केली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील आणि झोपडपट्ट्यांतील नागरिकांसाठी सुलभ व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ७०० आरोग्य सुविधा केंद्रांचे जाळे उभारण्याचे लक्ष्य आहे.

यात पुण्यात ५८ आपला दवाखाने सुरू केले जाणार होते. त्यापैकी २५ दवाखाने सुरू करण्याची तयारी पुणे महापालिकेने दर्शविली.या योजनेअंतर्गत आपला दवाखाना खासगी भाड्याच्या जागेत सुरू करावा, असा नियम आहे. या भाड्यापोटी महापालिकेला राज्य सरकारकडून पैसे मिळणार आहेत.

तत्कालीन महापालिका आयुक्तांनी भाड्याच्या जागेपेक्षा महापालिकेच्या जागांवरच आपला दवाखाना सुरू करण्याचा प्रस्ताव राज्याच्या आरोग्य विभागाला पाठवला.भाड्याच्या पैशातून महापालिकेच्या जागांमध्ये कायमस्वरूपी दवाखाने सुरू केले जातील, असा हेतू त्यामागे होता. महापालिकेचा हा प्रस्ताव राज्य सरकारने फेटाळला. त्यामुळे महापालिकेने स्वखर्चाने पहिला आपला दवाखाना मॉडेल कॉलनीतील चापेकरनगरमध्ये गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सुरू केला. महापालिकेने यंदा एप्रिल महिन्यात पुन्हा आपला दवाखान्याबाबत नवीन प्रस्ताव राज्य सरकारला पाठविला. यावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नसल्याने महापालिकेकडून केवळ एकच आपला दवाखाना सुरू आहे.

याचवेळी खासगी संस्थेच्या माध्यमातून सुरू होणारे ३३ पैकी १० दवाखाने सुरू झालेले आहेत. राज्य सरकारकडून निर्णय होत नसल्याने महापालिकेसमोर दवाखाने सुरू करण्याचा तिढा निर्माण झाला आहे. यामुळे कष्टकरी वर्ग आरोग्य सेवेपासून वंचित राहत आहे.आपला दवाखाना महापालिकेने स्वत:च्या जागेत सुरू करावा, असा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आलेला आहे. या प्रस्तावावर अद्याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे आपला दवाखाना सुरू करण्याचे काम प्रलंबित आहे.

### राज्य सरकारकडून पैसे मिळणार

सार्वजनिक आरोग्य विभागाने 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' ही योजना सुरू केली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील आणि झोपडपट्ट्यांतील नागरिकांसाठी सुलभ व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ७०० आरोग्य सुविधा केंद्रांचे जाळे उभारण्याचे लक्ष्य आहे. यात पुण्यात ५८ आपला दवाखाने सुरू केले जाणार होते. त्यापैकी २५ दवाखाने सुरू करण्याची तयारी पुणे महापालिकेने दर्शविली.या योजनेअंतर्गत आपला दवाखाना खासगी भाड्याच्या जागेत सुरू करावा, असा नियम आहे. या भाड्यापोटी महापालिकेला राज्य सरकारकडून पैसे मिळणार आहेत.

# आधार केंद्र वितरणात जिल्हा राज्यात प्रथम!

## आधार संच वितरणाची प्रक्रिया ही खुल्या जाहिरात राबविली

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**आधार केंद्र वितरणात पुणे जिल्ह्याने राज्यात आघाडी घेतली असून, रिक्त १२२ केंद्रांसाठी कालबद्ध कार्यक्रम राबवून या केंद्रांना आधार संच वितरणाची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. माहिती आणि तंत्रज्ञान विभागाकडून जिल्ह्यासाठी २०३ आधार संच प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने रिक्त केंद्रांसाठी आधार संच राबविण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयाकडून राबविण्यात आली होती.**




जिल्ह्यातील ग्रामीण भागांतील प्रत्येक महसूल मंडळ, नगर पालिका, पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या विचारात घेता तसेच शहरी भागात लोकांचे होणारे स्थलांतर विचारात घेता आधार केंद्रांची मोठी आवश्यकता होती. त्यानुसार जिल्हा स्तरावर आधार केंद्र वितरणाबाबतचा कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला होता.ग्रामीण कार्यक्षेत्राकरिता ६५ महसूल मंडळ, नगर पालिकेकरिता ७, पुणे महापालिकेसाठी २२ तर पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी २८ रिक्त केंद्र अशा एकूण १२२ रिक्त आधार केंद्रांसाठी जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती, अशी माहिती उपजिल्हाधिकारी पल्लवी घाटगे यांनी दिली. अर्जदाराकडे 'आपले सरकार' सेवा केंद्र असणे, शासकीय जागेचे 'ना हरकत' प्रमाणपत्र असणे, अर्हता पात्र पर्यवेक्षक असणे इत्यादी अटी निश्चित करण्यात आल्या होत्या. पात्र अर्जदारांमधून जिल्हाधिकारी कार्यालयात १२ जून रोजी सोडतीद्वारे (लकी ड्रॉ) सर्व अर्जदारांसमक्ष अंतिम अर्जदारांची निवड करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत यापूर्वी वितरण झालेले आधार संच जुने झालेले असल्याने त्यांना नवीन आधार संच बदलून देण्याबाबत शासनाची मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेली आहे. त्यानुसार जिल्हास्तरावरुन कार्यवाही सुरू आहे. अंतिम पात्र ठरलेल्या आपले सरकार सेवा केंद्र धारकांना नुकतेच धान्य गोदाम वडकी येथे आधार संचांचे वितरण करण्यात आल्याचे घाटगे यांनी सांगितले.आधार संच वितरणाची प्रक्रिया ही खुल्या जाहिरात देऊन राबविल्याने माझ्यासारख्या गरजू व्यक्तीला न्याय मिळाला. लॉटरीद्वारे अर्जदारांची निवड केल्याने आधार संच वितरणाबाबत कोणतीही शंका राहिली नाही.जिल्ह्यातील ग्रामीण भागांतील प्रत्येक महसूल मंडळ, नगर पालिका, पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या विचारात घेता तसेच शहरी भागात लोकांचे होणारे स्थलांतर विचारात घेता आधार केंद्रांची मोठी आवश्यकता होती. त्यानुसार जिल्हा स्तरावर आधार केंद्र वितरणाबाबतचा कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला

### शासनाची मार्गदर्शक सूचना प्राप्त

२२ तर पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी २८ रिक्त केंद्र अशा एकूण १२२ रिक्त आधार केंद्रांसाठी जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती, अशी माहिती उपजिल्हाधिकारी पल्लवी घाटगे यांनी दिली. अर्जदाराकडे 'आपले सरकार' सेवा केंद्र असणे, शासकीय जागेचे 'ना हरकत' प्रमाणपत्र असणे, अर्हता पात्र पर्यवेक्षक असणे इत्यादी अटी निश्चित करण्यात आल्या होत्या.

# देहूरोड कॅन्टोन्मेंटचा पिंपरी-चिंचवडमध्ये समावेश नाही!

## महापालिकेची नापसंती, झोपडपट्टी, रेडझोनमुळे विकासाला संधी नाही

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवडः खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा रहिवासी भाग पिंपरी-चिंचवड महापालिकांमध्ये विलीनीकरण राज्य शासनाने तत्त्वतः मान्यता दिली आहे. मात्र, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डातील नागरी भाग पिंपरी-चिंचवड महापालिकेत विलीन करण्याचा निर्णय होऊ शकला नाही. देहूरोडमध्ये झोपडपट्ट्यांचे असलेले मोठे प्रमाण, रेड झोनचे मोठे क्षेत्र, संरक्षण खात्याची सर्वाधिक जागा यामुळे कॅन्टोन्मेंटचा समावेश करू नये, अशी स्पष्ट भूमिका महापालिका प्रशासनाने घेतली होती. या रेड सिङ्गलमुळे देहोड कॅन्टोन्मेंटचा महापालिकेत समावेश झाला नसल्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.**






पिंपरी-चिंचवड महापालिकेत हिंजवडी, माण, मारूंजी, गहुंजे, जांबे, नेरे आणि सांगवडे या सात गावांचा समावेशाचा नर्णय मागील दहा वर्षांपासून प्रलंबित आहे. असे असतानाच राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने दोन वर्षापूर्वी पिंपरी महापालिका हद्दीशेजारील देहूरोड कॅन्टोन्मेंटचा समावेश करण्यासाठी सविस्तर अभिप्राय २७ मार्च २०२३ ला मागविला होता. त्यानंतरमहापालिका प्रशासनाने देहूरोड कॅन्टोन्मेंटबाबत अहवाल तयार करून ७ जून २०२३ ला राज्य सरकारला पाठविला होता.

देहूरोडची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ४८ हजार ९६१ आहे. प्रत्यक्षात लोकसंख्या ६० हजारांहून अधिक आहे. मतदार संख्या केवळ ३४ हजार आहेत. देहूरोड भागात दहा झोपडपट्या आहेतक्षेत्रफळ ९ हजार ३८ एकर आहे. देहूरोडलगतच्या किवळे, रावेत व मामुर्डी, विकासनगर या भागाचा समावेश सन १९९७ मध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेत गेला आहे.

मात्र, अपेक्षित विकास साधण्यात महापालिकेला यश आलेले नाही. विकासही नाही आणि भरमसाट मालमत्ताकर यामुळे देहूरोड कॅन्टोन्मेंटमधील रहिवाशांनी महापालिकेत समावेशास विरोध केला. देहरोडचा बहुतांश भाग संरक्षण विभागाच्या प्रतिबंधित क्षेत्रात रेड झोनमध्ये आहे. अनेक शेतकऱ्यांच्या बहुतांश जमिनी लष्कराने संपादित केलेल्या आहेत. कैन्टोन्मेंटचे अध्यक्ष लष्करी अधिकारी असल्याने देहूरोड कॅन्टोन्मेंट व लष्कर यांचा संवाद व समन्वय साधता येत असल्याने समस्या तातडीने दूर करणे शक्य होते. तसेच, रेड झोनचा प्रश्न सुटला नसल्याने देहूरोड हद्दीत विकासकामे करताना महापालिकेला मर्यादा असल्याने अपेक्षित विकास होणार नाही, असे नागरिकांचे मत आहे.

### संरक्षण विभागाचा निर्णय ठरणार महत्त्वाचा

शेजारच्या पुणे महापालिकेत पुणे व खडकी कॅन्टोन्मेंटचा नागरी परिसर जोडण्यास राज्य शासनाने तत्वतः मान्यता दिली आहे. मात्र, महापालिकेकडून नापसंती असल्याने देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील नागरीवस्ती महापालिकेत समाविष्ट झालेली नाही, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले; मात्र भविष्यात संरक्षण विभागाने रेटा लावल्यास तो नागरी भाग महापालिकेस समावेश करण्याशिवाय पर्याय रापिंपरी-चिंचवडमध्येस्पष्ट करण्यात आले आहे.

### विकासाला संधी नाही

देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचे एकूण ३६.५७ चौरस किलोमीटर क्षेत्र पिंपरी-चिंचवड महापालिकेत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव होता. तेथील लोकसंख्या ६० हजारांपेक्षा अधिक आहे. त्यापैकी तब्बल ८७ टके क्षेत्र हे रेडझोन बाधित आहे.२०११ च्या जनगणनेनुसार देहूरोड मध्ये मतदार संख्या केवळ ३४ हजार आहेत. देहूरोड भागात दहा झोपडपट्या आहेत. त्यामुळे विकासाला कोणतीही संधी नाही. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोडांचे उत्पन्न अल्प आहे. देखभाल व कर्मचाऱ्यांच्या वेतनावर मोठी रकम खर्ची पडत आहेत.

---

# तुकोबांच्या पालखीचे स्वागत यंदा माऊलींच्या आळंदीत होणार!

## आळंदी देवस्थानच्या निमंत्रणाला देहू संस्थानकडून होकार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नुकतीच आषाढी वारी संपन्न झाली. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे आळंदी नगरीत स्वागत झाले. देहूच्या संत तुकाराम महाराज पालखीचा परतीचा प्रवास सुरू आहे. याच दरम्यान आषाढ वद्य दशमीचे दिवशी अर्थात 20 जुलै रोजी तुकाराम महाराजांच्या पालखीने आळंदीमध्ये स्वागताचा पाहुणचार घ्यावा असे निमंत्रण संस्थांकडून देण्यात आले.या निमंत्रणाला देहू संस्थांनने होकार कळविला आहे. त्यामुळे अनेक वर्षानंतर तुकोबांची पालखी आषाढी वारीनंतर परतीचे प्रवास माऊलींच्या आळंदी नगरीत संपन्न करणार आहे. यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळणार असल्याचे देवस्थाने म्हटले आहे..**

### 20 जुलै रोजी होणार तुकोबांच्या पालखीचे आळंदीत स्वागत








याबाबतची अधिक माहिती आळंदी देवस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी दिली. ते म्हणाले, संत ज्ञानेश्वर महाराज यांचे ७५० वे जयंती वर्ष व जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे ३७५ वे वैकुंठ गमन वर्षाचा दुग्धशर्करा योग या वर्षाचे औचित्य साधून आळंदी देवस्थाने श्री संत तुकाराम महाराज संस्थानला पालखी परतीचे प्रवासात आषाढ वद्य दशमीचे दिवशी आळंदीस मुक्कामी यावे हे निमंत्रण दिले. हे निमंत्रण देहू संस्थांनने स्वीकारले आहे.

यंदा संत तुकाराम महाराजांची पालखी सोहळा देहूत परतण्यापूर्वी रविवारी(दि.२०) रोजी श्री क्षेत्र आळंदीत मुक्कामी येणार आहे.संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने दिलेले आमंत्रण जगतगुरु तुकाराम महाराज संस्थानने स्वीकारले असून,आळंदी मुक्कामी येण्याचे कळविले आहे.

### आठवणींना मिळाला उजाळा!

सन १६८७ साली संत तुकाराम महाराजांचे धाकटे चिरंजीव तपोनिधी नारायण महाराजांनी पालखी सोहळा सुरू केला.त्यावेळेस जाताना व येताना श्री क्षेत्र आळंदी मार्गेच पालखी प्रवास होत होता त्या आठवर्णीना या निमित्ताने उजाळा मिळत आहे असेही ज्ञानेश्वर वीर म्हणाले.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### गुरू सांगेल तेच साधन.

परमार्थ म्हणजे काय, हे मी तुम्हाला अगदी थोडक्यात सांगतो. परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ती सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदु:ख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे. गुरू कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कुठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहत असतील; दुसरा कुणी आणखी कोणत्या गावी राहत असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले, तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पाहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात रहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ; तो सांगेल तेच साधन. तुम्ही आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात, तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा.

खरा परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही, तो स्वत:करता आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थकता नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. एकाने कोळशाचे दुकान घातले आणि दुसऱ्याने पेढ्याचे दुकान घातले; दुकान कशाचेही असले, तरी शेवटी फायदा किती होतो, याला महत्त्व आहे. तसे, प्रपंचात कमी जास्त काय आहे याला परमार्थात महत्त्व नसून, मनुष्याची वृत्ती भगवंताकडे किती लागली याला महत्त्व आहे. परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे. एकीकडून मनाचे संयमन आणि दुसरीकडून भक्तीचा जोर असला, म्हणजे परमार्थ लवकर साधतो. खरोखर, परमार्थ इतका सोपा आहे, की तो सहज रीतीने करता येतो. पण गंमत अशी, की तो सोपा आहे म्हणून कुणीच करीत नाही. प्रपंच हा परमार्थाच्या आडकाठीसाठी नाही, तो परमार्थासाठीच आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. साधकाने देहाचे कर्तव्य प्रारब्धावर टाकून, मनाने मात्र ईश्वरोपासना करावी.

बोधवचन:- हृदयी ठेवा राम। मुखी सदा त्याचे नाम। हातात असावे प्रपंचाचे काम। हेच खरे परमार्थाचे मर्म॥

# मुख्यमंत्रीपदासाठी कोणाची हवा, पुढील मुख्यमंत्री कोण असावा ?






'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये नेतृत्व बदलाची कसलीही हालचाल नाही, हे प्रथम लक्षात घ्या, पण भाजपाच्या अंतर्गत जर डोकावले तर नरेंद्र मोदी यांच्या ठिकाणी कोण? हा प्रश्न मात्र चर्चिला जाऊ लागला आहे. तसे झाले तर भाजपामध्ये मोठे फेरफारही होऊ शकतात आणि मग, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण? हा नवा प्रश्नही उपस्थित होऊ शकतो !**

### नरेंद्र मोदींच्या मनात काय?

भारताचे जोपर्यंत नरेंद्र मोदी पंतप्रधान आहेत तोपर्यंत दूरदूरपर्यंत त्या पदासाठी दुसऱ्या कोणाच्याही नावाची चर्चा होऊ शकत नाही किंवा ती करण्याची कोणाची हिंमतही नाही! ते एकदा निवृत्त झाले, किंवा त्यांनी तसे संकेत दिले तर मग चर्चा सुरू होईल. कदाचित, त्याआधी मोदी यांनीच पुढील नाव सुचविलेले असेल, त्यांनी भावी पंतप्रधानांना ट्रेनिंग द्यायला सुरुवात केलेली असेल, लवकरच मोदी वयाची ७५ पूर्ण करत आहेत. त्यानंतर ते लगबगीने राजीनामा देतील, असे काहींना वाटत असले तरी असे अजिबात घडणार नाही, हे पण लक्षात ठेवा!

### अजून काही वर्षे देशात नरेंद्र, राज्यात देवेंद्र !

दरम्यान, २०२९ पर्यंत नरेंद्र मोदी हेच त्या पदावर असतील, त्यानंतरच्या यादीत अर्थात् च देवेंद्र फडणवीस हे एकमेव त्या पदाचे दावेदार असतील, असे चित्र भाजपा वाल्यांनी आज तरी रेखाटले आहे. कारण, मोदींच्याच ते तसे मनात आहे, असे संकेत मिळतात. थोडक्यात, २०२८ पर्यंत देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे मुख्यमंत्री असतील, फेरफार किंवा फेरबदल केवळ मंत्रिमंडळात होतील, असे सध्या तरी मानायला हरकत नाही!

### थोडासा इतिहास पाहा...

प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे हे ज्यावेळी महाराष्ट्राची सूत्रे सांभाळायचे, त्यावेळी महाराष्ट्रातील अन्य नेते म्हणजे राम नाईक, राम कापसे, धर्मचंद चोरडिया हे त्यांना वारंवार सांगायचे, की शिवसेनेबरोबर युती नको,आपण स्वतंत्र लढू या ! अर्थातच त्यांचे ऐकले गेले नाही आणि त्यातून भाजपाने पायावर कुऱ्हाड मारून घेतली. बाकीचे थोडेसे आमदार अनेकदा म्हणायचे कुबड्या हव्यातच कशाला? पण त्या दोघांनी सल्ले हसण्यावारी नेले आणि केवळ झटक्यात सत्ता मिळविण्याच्या लालसेतून स्वतःचे आणि भाजपाचे मोठे वाटोळे करून घेतले, हे आज लक्षात येत आहे. पण, जी चूक त्यांनी केली, यापुढे भाजपा करेल असे वाटत नाही ! म्हणजे, त्यावेळी युतीची सूत्रे शिवसेनेकडे होती. आता 'महायुती' ची सूत्रे भाजपा स्वतःकडे ठेवेल !

### पूर्वीचा फंडा, उगीचच गंडा !

पूर्वीच्या भाजपाची स्ट्रॅटेजी हल्लीच्या नेत्यांना मुळीच मान्य नसणार. त्यावेळी भाजपा हा कमकुवत पक्ष होता आणि आता तो देशातील सर्वात बलशाली पक्ष झालेला आहे हे लक्षात घेऊ या. आजच्या भाजपा वरिष्ठांना म्हणजे त्यात अर्थात नरेंद्र मोदी, अमित शाह, देवेंद्र फडणवीस आणि सरसंघचालक मोहन भागवत आले त्यांना ही समीकरणे मान्य नसणार! वरिष्ठांचे महाराष्ट्राबाबत एकमत असल्याने, कुबड्या घेऊन फार तर राज्यात सत्तेत येण्याची भाजपाची ही शेवटची वेळ होती.

### एकनाथ शिंदेंचे पुढे काय?

मग, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे काय ? हा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. त्यावर उत्तर आहे, की शिंदे आता तसेही भाजपाचेच एक भाग आहेत आणि पश्चिम महाराष्ट्रात विशेषतः मराठा तरुणांना एकत्र ठेवण्यासाठी एक 'पवार' लागतात, त्यासाठी केवळ अजित पवारांना भाजपाबाहेर ठेवून त्यांच्याशी जमवून घेतले जाणार आहे, नक्की नेमके हेच घडणार आहे ! भाजपाचे हे नवे समीकरण एकनाथ शिंदे किंवा अजित पवार यांना विश्वासात घेऊनच खेळले जाईल !

### सध्या फक्त आणि फक्त फडणवीस !

देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री कोण? भाजपा आणि 'महायुती' च्या विरोधी पक्षांचा सध्या तरी काही वर्षे विचार करण्याची गरज नाही, त्यांनी मुख्यमंत्रीपदाची सत्तेची स्वप्ने बघण्याचे काम फक्त फडणवीस यांनी बाकी ठेवले आहे! आजच्या तारखेला फडणवीसांनंतर पुढील मुख्यमंत्री कोण? असे विचारले, तर अनेक हात वर येतील, आम्हाला करा आम्हाला करा..असे अनेक म्हणतील! अगदी श्रीकांत भारतीय देखील हात वर करतील.

### मराठा का मराठेतर...?

पण, मराठाच हवा हा विचार जर पुढे आला तर एकनाथ शिंदे किंवा रवींद्र चव्हाण आणि मराठेतर हवा असे सांगितले गेले तर देवेंद्र यांची पहिली पसंती त्यांचे लाडके आणि आवडते चंद्रशेखर बावनकुळे हे एकमेव असतील. त्याशिवाय अनेकांना मुख्यमंत्री व्हावेसे वाटते. पण, आशिष शेलार, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन इत्यादीपैकी एक असाही वरिष्ठांचा सूर निघाला, तर त्यांचा तो निर्णय नक्कीच काँग्रेसच्या वळणावर गेलेला असेल! म्हणजे जे इच्छुक आणि उत्सुक असायचे, ज्यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा असायची, ते बाजूला पडायचे आणि कोपऱ्यात बसून मुसू मुसू रडतांना दिसायचे आणि भलतेच 'बावळट' नाव पुढे यायचे.. त्याच बावळटांनी पुढे स्वतःची घरे भरली आणि राज्यातल्या, देशातल्या काँग्रेसची वाट लावली. भाजपामध्ये काँग्रेस पद्धतीचे 'बावळट' औषधाला देखील सापडणार नाहीत. पण नवखे नाव एकदम पुढे येईल, असेही घडणार नाही.

### चांगले बाजूला, चमचे पुढे..

काँग्रेसमध्ये जे चांगले होते, ते बाजूला पडले आणि जे चमचे होते तेच नेमके मुख्यमंत्री झाले. भाजपाला आपले तसे वाटोळे करवून घ्यायचे नाही. ते सावध असतात आणि चाणाक्ष, चतुर आहेत. भाजपाचा पुढला मुख्यमंत्री कोण आणि का हा प्रश्न सध्या फक्त चर्चेसाठी ठेवायला हरकत नाही.. दिल्ली अबभी बहोत दूर है !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आदिवासींची शबरी घरकुल योजना रखडली!

## पाच वर्षांपासून शबरी घरकुल योजना संथगतीने सुरू

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मागील पाच वर्षांपासून सुरू केलेली शबरी घरकुल योजना काही अडचणींमुळे संथगतीने सुरू आहे. आतापर्यंत सुमारे २ लाख ४१ हजार आदिवासी व अनुसूचित जमातीच्या कुटुंबाला घरे देण्याचे उद्दिष्ट्य होते. त्यापैकी १ लाख ८० हजार ४८४ घरकुले मंजूर झाली आहेत. उर्वरित ६१ हजार १८६ घरकुले दुसऱ्या टप्प्यात हाती घेतली जाणार असल्याची कबुली आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी विधान परिषदेत दिली.**



राज्यातील शबरी घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना घरे मिळाली नाहीत. अनियमितता झाल्याची बाब आर्थिक पाहणी अहवालातून समोर आल्याप्रकरणी अभिजित वंजारी यांनी परिषदेत तारांकित प्रश्न विचारला होता. आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी आदिवासींच्या घरकुल योजनेबाबत वस्तुस्थिती मांडण्याची मागणी केली. यावर आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी दिली. शबरी घरकुल योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना एकूण १ लाख २० हजार इतका निधी मिळतो. घर मंजूर होताच १५ हजार डीबीटी द्वारे, घराच्या जोत्याच्या बांधकामासाठी ४५ हजार, छताच्या टप्प्यावर ४० हजार व उर्वरित रक्कम घर पूर्ण झाल्यावर अशा चार टप्प्यांत दिली जाते. तसेच मनरेगाच्या अंतर्गत मंजुरीप्रमाणे अतिरिक्त निधी देण्यात येतो. राज्य सरकारने सन २०२१ – २२ ते २०२४ ते २५ या पाच वर्षांच्या कालावधीत २ लाख ४१ हजार ६७० घरकुलांचे उद्दिष्टे होते. त्यापैकी १ लाख ८० हजार ४८४ घरकुल मंजूर झाली. उर्वरित ६१ हजार १८६ प्रकरणे प्रगतीपथावर आहे. दुसरा टप्पा १ एप्रिलपासून सुरू केला आहे.

एकही आदिवासी कुटुंब घरकुलपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही उईके यांनी परिषदेत दिली. दरम्यान, नंदुरबारमधील काही कुटुंब वंचित असतील, तर त्यांच्या समस्यांसाठी स्वतंत्र बैठक घेऊन त्या सोडविण्याची तयारी आहे. तांत्रिक अडचणी, जागेचा अभाव, स्थलांतर, वारसदारांचे प्रश्न आदि अनेक प्रकरणांमुळे योजना रखडली. परंतु, समन्वयाने यावर तोडगा काढला जाईल. रखडलेली ही घरकुले दुसऱ्या टप्प्यात पूर्ण करण्यावर भर राहील.

२०११ पूर्वी अतिक्रमित जागेवर राहणाऱ्यांना नियमानुकुल करून दिली जातील. ज्यांच्याकडे प्लॉट नाही, अशांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय योजनाअंतर्गत आर्थिक मदतीद्वारे घरासाठी जागा घेण्याची तरतूद केल्याची माहिती, अशी माहिती उईके यांनी दिली. महाराष्ट्रातील आदिवासी व अनुसूचित जमातीच्या प्रत्येक कुटुंबांना निवारा दिल जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यातील शबरी घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना घरे मिळाली नाहीत. अनियमितता झाल्याची बाब आर्थिक पाहणी अहवालातून समोर आल्याप्रकरणी अभिजित वंजारी यांनी परिषदेत तारांकित प्रश्न विचारला होता. आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी आदिवासींच्या घरकुल योजनेबाबत वस्तुस्थिती मांडण्याची मागणी केली. यावर आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी दिली. शबरी घरकुल योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना एकूण १ लाख २० हजार इतका निधी मिळतो. घर मंजूर होताच १५ हजार डीबीटी द्वारे, घराच्या जोत्याच्या बांधकामासाठी ४५ हजार, छताच्या टप्प्यावर ४० हजार व उर्वरित रक्कम घर पूर्ण झाल्यावर अशा चार टप्प्यांत दिली जाते.

### अनेक प्रकरणांमुळे योजना रखडली

तसेच मनरेगाच्या अंतर्गत मंजुरीप्रमाणे अतिरिक्त निधी देण्यात येतो. राज्य सरकारने सन २०२१ – २२ ते २०२४ ते २५ या पाच वर्षांच्या कालावधीत २ लाख ४१ हजार ६७० घरकुलांचे उद्दिष्टे होते. त्यापैकी १ लाख ८० हजार ४८४ घरकुल मंजूर झाली. उर्वरित ६१ हजार १८६ प्रकरणे प्रगतीपथावर आहे. दुसरा टप्पा १ एप्रिलपासून सुरू केला आहे. एकही आदिवासी कुटुंब घरकुलपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही उईके यांनी परिषदेत दिली. दरम्यान, नंदुरबारमधील काही कुटुंब वंचित असतील, तर त्यांच्या समस्यांसाठी स्वतंत्र बैठक घेऊन त्या सोडविण्याची तयारी आहे. तांत्रिक अडचणी, जागेचा अभाव, स्थलांतर, वारसदारांचे प्रश्न आदि अनेक प्रकरणांमुळे योजना रखडली. परंतु, समन्वयाने यावर तोडगा काढला जाईल. रखडलेली ही घरकुले दुसऱ्या टप्प्यात पूर्ण करण्यावर भर राहील.

# कर्जाचा बोजा उतरविण्यासाठी 'ऑनलाइन' प्रक्रिया

## आता उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कर्ज काढून वाहन खरेदी केलेल्यांना वाहनावरील 'कर्जाचा बोजा' उतरविताना स्थानिक उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात जाण्याची आवश्यकता भासणार नाही. 'आरटीओ'च्या वाहन प्रणालीवरून अर्ज केल्यानंतर संबंधित बँकेकडून कर्जाचा बोजा नसल्याबाबतची माहिती 'आरटीओ'कडे पाठविली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होणार आहे.**




नागरिकांनी कर्ज काढून वाहन घेतले असल्यास कर्जफेडीनंतर त्यांना बँकेकडून त्याबाबतचे प्रमाणपत्र घ्यावे लागते. ते जमा केल्यानंतर संबंधित वाहनांवर कर्ज नसल्याची नोंद 'आरटीओ'त करण्यात येते. त्यानंतर जुने नोंदणी प्रमाणपत्र (आरसी बुक) घेऊन नवीन 'आरसी बुक' दिले जाते. या प्रकियेसाठी वाहनधारकाला 'आरटीओ'त प्रत्यक्ष जावे लागत होते. आता ही प्रक्रिया ऑनलाइन होणार आहे. केंद्र सरकारने नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नागरी सेवा अधिक सक्षम, गतिमान आणि सुलभ करण्यासाठी 'फेसलेस' सेवेचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे. राज्याच्या परिवहन आयुक्तांनी परिपत्रक काढून 'आरटीओ'मध्ये ही सुविधा सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत.'ऑनलाइन प्रक्रिया पारदर्शक आहे. ऑनलाइन अर्ज केल्यानंतर याबाबतची माहिती बँकेकडे जाणार असून, संबंधित बँक ही कर्ज बोजा नसल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि माहिती 'आरटीओ'कडे पाठविणार आहे. त्यामुळे नागरिकांना कोणत्याही कागदपत्राची प्रत सादर करण्याची आवश्यकता भासणार नाही,' अशी माहिती परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी दिली.परिवहन विभागाने 'फेसलेस' प्रक्रियेचा अवलंब केला असल्याने अर्जदाराला ऑनलाइन अर्ज करावा लागणार आहे.

### बँकेला 'वाहन प्रणाली' जोडले


अर्जदाराची पडताळणी आधारकार्डला जोडणी केलेल्या मोबाइल क्रमांकावर एक वेळ गोपनीय क्रमांक (ओटीपी) पाठवून करण्यात येणार आहे. आधार कार्डवर असलेले नाव आणि परिवहन विभागाच्या अभिलेखात असलेले नाव, याबाबतची माहिती तंतोतंत जुळते का, याची खातरजमा होणार आहे.त्यानंतरच संबंधित बँकेमार्फत वाहन प्रणालीवरच त्या वाहनावरील कर्ज बोजा संपुष्टात आल्याची माहिती पाठविण्यात येणार आहे. या प्रक्रियेत अर्जदाराला ऑनलाइन नमुना क्रमांक ३५ आणि इतर कागदपत्रे संगणकीकृत करावी लागणार आहेत. या प्रक्रियेत प्रत्यक्ष दस्तऐवज सादर करण्याची गरज नसल्याने नागरिकांना 'आरटीओ'मध्ये जाण्याची आवश्यकता नाही, असे भीमनवार यांनी सांगितले.परिवहन विभागाने फेसलेस सुविधेचा अवलंब करण्यासाठी देशभरातील ३५ ते ४० बँकांशी 'वाहन प्रणाली' जोडली आहे.

# जवाहरलाल नेहरू यांनी भारताला उभे केले !

## पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताला धावायला लावत आहेत

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताचे भविष्य हे त्याच्या सुप्त शक्तीत आहे जसे की, योग, अन्न, अध्यात्म आणि संस्कृती, असे विधान प्रसिद्ध डच लेखक अदजीएज बकास यांनी केले आहे. भू-राजकीय रणनीतीकार विन्को डेव्हिड यांच्यासह सह लेखन केलेल्या #FORWARDISM या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी बकास मागच्या आठवड्यात मुंबईत आले होते. यावेळी त्यांनी भारतासंदर्भात आपले विचार व्यक्त केले. अमेरिकेने केवळ सैन्याच्या जोरावर जगावर नियंत्रण मिळवले असे नाही, ती त्यांची सुप्त शक्ती होतीच. पण हॉलिवूड, फॅशन इत्यादीनेही अमेरिकेला वर आणले. त्याचप्रमाणे भारताकडेही जगाला देण्यासारखे योग, ध्यान, संस्कृती, फॅशन, चित्रपट आणि संगीत अशा बऱ्याच गोष्टी आहेत.**





### आध्यात्मिक क्षेत्रातही भारताचा ठसा

“भारत दिवसेंदिवस बळकट होत चालला आहे. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी भारताला उभे केले, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताला काम करायला लावले आणि विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताला धावायला लावत आहेत.”मूळ भारतीय वंशाचे असलेले बकास हे जागतिक पातळीवर भविष्यवेत्ता आणि ट्रेंडवॉचर म्हणून ओळखले जातात. त्यांनी आजवर ४० हून अधिक पुस्तकांचे सहलेखन केले आहे. या कार्यक्रमात बोलत असताना ते म्हणाले, न्यूयॉर्क आणि लंडन हे ग्लोबल नॉर्थचे दोन आर्थिक केंद्र आहेत. याप्रमाणेच ग्लोबल साऊथ मधील दुबई आणि मुंबई यांच्यादरम्यान जर रेल्वे प्रकल्प उभारल्यास या दोन शहरांतील प्रवास अवघ्या ३० मिनिटांत शक्य होईल. ग्लोबल साऊथचे आर्थिक केंद्र म्हणून ही दोन शहरे काम करू शकतील.

तसेच जग आता अधिकाधिक शाकाहाराला पसंती देऊ लागले आहे. अशावेळी भारताला जगावर आपला प्रभाव टाकण्याची मोठी संधी आहे. भारताकडे शाकाहारी जेवण पद्धतीची मोठी परंपरा आहे. रिसीपीजची जणू खाणच भारताकडे आहे, असेही ते म्हणाले. भारताच्या प्रगतीचा उल्लेख करत असताना बकास यांनी विकासाचे काही टप्पे विशद केले. ते म्हणाले, “भारत दिवसेंदिवस बळकट होत चालला आहे. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी भारताला उभे केले, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताला काम करायला लावले आणि विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताला धावायला लावत आहेत.”मूळ भारतीय वंशाचे असलेले बकास हे जागतिक पातळीवर भविष्यवेत्ता आणि ट्रेंडवॉचर म्हणून ओळखले जातात. त्यांनी आजवर ४० हून अधिक पुस्तकांचे सहलेखन केले आहे. या कार्यक्रमात बोलत असताना ते म्हणाले, न्यूयॉर्क आणि लंडन हे ग्लोबल नॉर्थचे दोन आर्थिक केंद्र आहेत. याप्रमाणेच ग्लोबल साऊथ मधील दुबई आणि मुंबई यांच्यादरम्यान जर रेल्वे प्रकल्प उभारल्यास या दोन शहरांतील प्रवास अवघ्या ३० मिनिटांत शक्य होईल. ग्लोबल साऊथचे आर्थिक केंद्र म्हणून ही दोन शहरे काम करू शकतील.बकास पुढे म्हणाले की, आध्यात्मिक क्षेत्रातही भारत प्रासंगिक आहे. युरोपमधील जेन झी आता आता देवाकडे वळत आहे. भारताला मोठा आध्यात्मिक वारसा लाभलेला आहे. त्यांनी तो जगाला द्यावा.

भारतात आध्यात्मिक पर्यटन जोरात चालू शकते, याचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, भगवान श्रीकृष्णाची द्वारका पुन्हा उभी करावी. गौतम बुद्धांनी भारतात अनेक ठिकाणी वास्तव्य केले. येशू ख्रिस्त यांनीही २० वर्ष भारतात घालवली होती.बकास पुढे म्हणाले की, या पुस्तकाच्या निमित्ताने माझी भारतात घरवापसी झाली आहे. माझे पूर्वज हे उत्तर प्रदेशमधील बरेलीचे होते.

१८७० मध्ये जेव्हा अमेरिकेत गुलामगिरीचा बिमोड झाला तेव्हा ते दक्षिण अमेरिकेतील सुरीनाम येथील डच कॉलनीत स्थलांतरीत झाले. तिथे शेतीसाठी मजुरांची गरज होती.बकास पुढे म्हणाले की, मला भारताचे भविष्य स्पष्टपणे दिसत आहे. पुढील काळात भारताची भरभराट होईल.१८२० मध्ये भारत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होता. इतिहासाची पुनरावृत्ती लवकराच होणार असून या किंवा पुढील वर्षी भारत हे स्थान पुन्हा प्राप्त करेल. तसेच जग आता अधिकाधिक शाकाहाराला पसंती देऊ लागले आहे. अशावेळी भारताला जगावर आपला प्रभाव टाकण्याची मोठी संधी आहे. भारताकडे शाकाहारी जेवण पद्धतीची मोठी परंपरा आहे. रिसीपीजची जणू खाणच भारताकडे आहे, असेही ते म्हणाले.

# मुलांना खासगी शाळेत पाठवणं थांबवा!

## मध्यमवर्गीयांना बुडवणारं गणित चार्टर्ड अकाउंटंटनं उलगडलं

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतामधील खाजगी शिक्षण हे विशेषाधिकार नाही तर आर्थिक सापळा बनत चालले आहे, असा इशारा शिक्षिका आणि चार्टर्ड अकाउंटंट मीनल गोयल यांनी दिला आहे. त्या म्हणतात की, मध्यमवर्गीय पालक मुलांच्या शाळेच्या वाढत्या शुल्कांमुळे कोलमडत चालले आहेत.**



### 46,000 शाळांमध्ये शौचालय नाही

” दिल्ली सरकारच्या एका सर्वेक्षणात असे आढळून आले की, दिल्लीतील शाळांमधील सहावीच्या ७०% विद्यार्थ्यांना एकही परिच्छेद वाचता येत नाही. याबाबत मनी टुडेने वृत्त दिले आहे. याचबरोबर, सार्वजनिक शाळांमधील सुविधांची परिस्थिती दयनीय आहे. १ लाख शाळांमध्ये वीज नाही, ४६,००० शाळांमध्ये शौचालय नाही, तर ३९,००० शाळांमध्ये पिण्याचे पाणीही नाही. भारत शिक्षणावर जीडीपीच्या फक्त ४.६% खर्च करतो, जो शिफारस केलेल्या ६% पेक्षा खूपच कमी आहे.दरम्यान, खाजगी शाळा, ज्यांना कायदेशीररित्या नफा न मिळवणाऱ्या संस्था म्हणून काम करणे बंधनकारक आहे, त्यांनी पळवाटा शोधल्या आहेत. मालक शेल कंपन्यांद्वारे त्यांच्या स्वतःच्या शाळांना मालमत्ता भाड्याने देतात, जास्त भाडे आकारतात आणि त्याचा भार पालकांवर टाकतात.

गोयल यांच्या लिंक्डइन पोस्ट आणि व्हिडिओने खासगी शाळांच्या चमकदार प्रतिमेचा मुखवटा फाडला आहे. यामध्ये त्यांनी शुल्क रचनेचे विश्लेषण केले आहे. त्या म्हणाल्या, “प्रत्येक मुलाच्या शिक्षणासाठी दरवर्षी अडीच ते तीन लाख रुपये लागतात. यामध्ये प्रवेश शुल्क ३५,०००, शिकवणी शुल्क १.४ लाख रुपये, वार्षिक शुल्क ३८,०००, वाहतुकीसाठी ४४,००० ते ७३,००० रुपये आणि पुस्तके व गणवेशासाठी २०,००० ते ३०,००० रुपये यांचा समावेश आहे.”“मध्यम श्रेणीच्या शाळांचे शुल्क १ लाख रुपयांपासून सुरू होते, तर एलिट शाळा सहजपणे ४ लाखांपर्यंत शुल्क आकारतात”, असेही त्यांनी पोस्टमध्ये नमूद केले आहे.

हैदराबादमधील एका पालकाने शाळेने अनिवार्य केलेल्या विक्रेत्याकडून पाचवीच्या पाठ्यपुस्तकांसाठी ६,९०३ रुपये खर्च केल्याची माहिती दिली आहे. यामध्ये विक्रेत्याने त्या पालकाला कोणतीही सूट दिली नाही. भारताचे सरासरी वार्षिक उत्पन्न किती आहे? ते ४.४ लाख रुपये आहे. “आपण आरोग्यसेवेच्या महागाईबद्दल बोलतो, पण शिक्षणाची महागाई ही मध्यमवर्गीयांसाठी मूक हत्यार ठरत आहे”, असेही गोयल यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे.

फिनटेक कंपन्या आता शालेय शुल्कासाठी ईएमआय सेवा उपलब्ध करून देत आहेत.

त्यामुळे आता गृहकर्जासोबत शिक्षणाचेही हप्ते सुरू झाले आहेत.पण सार्वजनिक शाळा यासाठी पर्याय नाहीत, असेही त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. “शिक्षकांच्या ८ लाख जागा रिक्त आहेत. केवळ उत्तर प्रदेशात ५,००० शाळांमध्ये फक्त एक शिक्षक आहे.

# शोराची ऑडिशन क्लिप झाली व्हायरल



बॉलीवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी त्याच्या विविध भूमिकांसाठी ओळखला जातो. १९९९ साली प्रदर्शित झालेल्या 'सरफरोश' चित्रपटातून अभिनेत्याने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. २०१२ ला साली प्रदर्शित झालेल्या 'पतंग' या चित्रपटात अभिनेत्याने पहिल्यांदा प्रमुख भूमिका साकारली होती. २००४ साली प्रदर्शित झालेल्या ब्लॅक फ्रायडे आणि २०१२ प्रदर्शित झालेल्या गँग्स ऑफ वासेपुरमधील अभिनेत्याच्या भूमिका चांगल्याच गाजल्या. सध्या तो चित्रपटांसह वेब सीरीजमध्येदेखील काम करताना दिसतो. त्याच्या भूमिकांना प्रेक्षक दाद देताना दिसतात. आता मात्र अभिनेता त्याच्या भूमिकांमुळे नाही तर त्यांनी शेअर केलेल्या एका व्हिडीओमुळे चर्चेत आला आहे.अभिनेत्याने त्याच्या मुलीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. हा व्हिडीओ अभिनेत्याच्या मुलीची शोराची ऑडिशन क्लिप आहे. यामध्ये ती इंग्रजी डायलॉग बोलताना दिसत आहे. हे डायलॉग म्हणताना शोरमध्ये आत्मविश्वास दिसत आहे. नेटकरी तिच्या या आत्मविश्वासाचे कौतुक करत आहेत. गेल्या वर्षी शोरा सिद्दीकीने लंडनमधील वेस्ट एंड स्टेज - थिएटर समर स्कूलमध्ये 'ब्युटी अँड द बीस्ट'मध्ये काम केले आहे. सध्या ती लंडनमध्ये अभिनयाचे शिक्षण घेत आहे. ती अनेकदा मुंबईत चित्रपटांशी संबंधित कार्यक्रमांमध्ये नवाजुद्दीनसोबत दिसली आहे.

# मुलाला सोडून जाणं त्रासदायक

अनेकदा प्रसिद्ध अभिनेत्री त्यांच्या मुलांच्या जन्मानंतर करिअरमधून ब्रेक घेताना दिसतात. मुलांचं संगोपण करता यावं, त्यांना वेळ देता यावा यासाठी त्या काही काळ कामातून ब्रेक घेत असल्याचं पाहायला मिळतं. मात्र, पुन्हा कामाला सुरुवात केल्यानंतर मुलाला घरी ठेवून बाहेर कामावर जाणं हे त्यांच्यासाठी खूप कठीण असतं. अशाच एका प्रसंगावर छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्रीने तिचं मत व्यक्त केलं आहे. छोट्या पडद्यावरील प्रसिद्ध मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारत घराघरात पोहोचलेली अभिनेत्री अनिता हसनंदानी हिने मुलाच्या जन्मानंतर कामातून काही काळासाठी ब्रेक घेतला होता. याबाबत तिने नुकतच 'फिल्मी ग्यान'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं आहे. या मुलाखतीदरम्यान तिचा नवरा रोहित रेड्डीने तिच्यासाठी एक भावनिक मॅसेज पाठवला होता. तो मॅसेज ऐकल्यानंतर अनिताला रडू कोसळल्याचं या मुलाखतीमध्ये पाहायला मिळालं.अनिता हसनंदानी ही 'ये हैं मोहब्बतें' या मालिकेमुळे घराघरात प्रसिद्ध झाली होती. मुलाच्या जन्मानंतर तिने काही काळ अभिनयापासून विश्रांती घेतली होती. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत तिने याबद्दल सविस्तर सांगितलं आहे. या मुलाखतीदरम्यान तिच्या पतीने (रोहित रेड्डीने) तिला एक भावनिक मॅसेज पाठवला होता, तो ऐकून अनिताला अश्रू अनावर झाले.अनिता म्हणाली, "मी जेव्हा माझ्या मुलाला घरी ठेवून शूटिंगला जाते, माझ्यासाठी ती खूप मोठी आणि कठीण गोष्ट आहे. अशा वेळी रोहितने मला दिलेला पाठिंबा माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. एक आईच जाणू शकते की, मुलाला सोडून बाहेर जाणं किती वेदनादायक असतं."अनिताने आजवर 'ये हैं मोहब्बतें', 'गुटर गू', 'कसम से', 'बहू हमारी रजनीकांत', 'करम अपना अपना', 'त्रीदेवियां', 'कयामत', 'एक हजारों में मेरी बेहना है' आणि 'नागीन' अशा अनेक मालिकांमध्ये काम केलं आहेअनेकदा प्रसिद्ध अभिनेत्री त्यांच्या मुलांच्या जन्मानंतर करिअरमधून ब्रेक घेताना दिसतात. मुलांचं संगोपण करता यावं, त्यांना वेळ देता यावा यासाठी त्या काही काळ कामातून ब्रेक घेत असल्याचं पाहायला मिळतं. मात्र, पुन्हा कामाला सुरुवात केल्यानंतर मुलाला घरी ठेवून बाहेर कामावर जाणं हे त्यांच्यासाठी खूप कठीण असतं. अशाच एका प्रसंगावर छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्रीने तिचं मत व्यक्त केलं आहे. छोट्या पडद्यावरील प्रसिद्ध मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारत घराघरात पोहोचलेली अभिनेत्री अनिता हसनंदानी हिने मुलाच्या जन्मानंतर कामातून काही काळासाठी ब्रेक घेतला होता. याबाबत तिने नुकतच 'फिल्मी ग्यान'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं आहे. या मुलाखतीदरम्यान तिचा नवरा रोहित रेड्डीने तिच्यासाठी एक भावनिक मॅसेज पाठवला होता. तो मॅसेज ऐकल्यानंतर अनिताला रडू कोसळल्याचं या मुलाखतीमध्ये पाहायला मिळालं.अनिता हसनंदानी ही 'ये हैं मोहब्बतें' या मालिकेमुळे घराघरात प्रसिद्ध झाली होती. मुलाच्या जन्मानंतर तिने काही काळ अभिनयापासून विश्रांती घेतली होती. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत तिने याबद्दल सविस्तर सांगितलं आहे. या मुलाखतीदरम्यान तिच्या पतीने (रोहित रेड्डीने) तिला एक भावनिक मॅसेज पाठवला होता, तो ऐकून अनिताला अश्रू अनावर झाले.अनिता म्हणाली, "मी जेव्हा माझ्या मुलाला घरी ठेवून शूटिंगला जाते, माझ्यासाठी ती खूप मोठी आणि कठीण गोष्ट आहे. अशा वेळी रोहितने मला दिलेला पाठिंबा माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. एक आईच जाणू शकते की, मुलाला सोडून बाहेर जाणं किती वेदनादायक असतं."अनिताने आजवर 'ये हैं मोहब्बतें', 'गुटर गू', 'कसम से', 'बहू हमारी रजनीकांत', 'करम अपना अपना', 'त्रीदेवियां', 'कयामत', 'एक हजारों में मेरी बेहना है'



# 'चला हवा येऊ द्या'ला टक्कर देण्यासाठी 'स्टार प्रवाह'वर 'तो' परत येतोय!

टीआरपीच्या शर्यतीत अग्रेसर राहण्यासाठी सध्या छोट्या पडद्यावरील वाहिन्यांमध्ये जोरदार चढाओढ सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वीच 'झी मराठी' वाहिनीने 'चला हवा येऊ द्या'च्या नव्या पर्वाची घोषणा केली. हा शो २६ जुलैपासून शनिवारी आणि रविवार रात्री नऊ वाजता प्रसारित केला जाणार आहे. आता या लोकप्रिय कार्यक्रमाला टक्कर देण्यासाठी 'स्टार प्रवाह'वर 'आपला सिद्धू' नव्या जोमात पुनरागमन करणार आहे. 'आता होऊ दे धिंगाणा'चा नवीन सीझन लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'आता होऊ दे धिंगाणा'च्या या आधीच्या तिन्ही पर्वांना प्रेक्षकांनी भरभरुन प्रेम दिलं. रोजच्या धकाधकीच्या जीवनात निखळ मनोरंजनाचे क्षण घेऊन येणारा हा कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नाही तर सातासमुद्रापलीकडेही आवडीने पाहिला जातो. प्रेक्षकांचा हा लाडका कार्यक्रम चौपट मजा आणि चौपट धमाल घेऊन पुन्हा धिंगाणा घालण्यासाठी सज्ज झाला आहे.९ ऑगस्टपासून शनिवार आणि रविवार रात्री ९ वाजता 'आता होऊ दे धिंगाणा'चं चौथं पर्व सुरु होत आहे. प्रत्येत पर्वात प्रेक्षकांना काहीतरी नवं देण्याचा 'स्टार प्रवाह' वाहिनीचा प्रयत्न असतो. चौथ्या पर्वात प्रेक्षकांना थीमपार्कची जादू अनुभवता येणार आहे.थीमपार्कमध्ये ज्याप्रमाणे अद्भूत आणि अविश्वसनीय गोष्टींची सफर घडते अगदी त्याप्रमाणेच धिंगाणाचा मंच भन्नाट गेम्सच्या माध्यमातून मनोरंजनाची धमाल सफर घडवणार आहे. मागच्या पर्वात सुपरहिट ठरलेल्या 'स्मायली काय गायली', 'धुऊन टाक', 'गोरी गोरी पान गाते किती छान' या सुपरहिट फेऱ्या नव्या ट्विस्टसह या पर्वातही असणार आहेत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे गेल्या तीन पर्वात ज्या फेरीची सर्वाधिक चर्चा रंगली त्या साडे माडे शिंतोडेचं भव्यदिव्य रुप या पर्वाचं प्रमुख आकर्षण ठरेल.सुपरस्टार आणि सर्वांचा लाडका होस्ट सिद्धार्थ जाधव या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुन्हा एकदा धिंगाणा घालण्यासाठी सज्ज होत आहे. सिद्धार्थ जाधवचा सळसळता उत्साह आणि प्रवाह परिवाराचा धिंगाणा एकत्र अनुभवायचा असेल तर आता होऊ दे धिंगाणाचं चौथं पर्व पाहायलाच हवं, असं या प्रोमोतून सांगण्यात येत आहे. दरम्यान, 'आता होऊ दे धिंगाणा'चं चौथं पर्व ९ ऑगस्टपासून दर शनिवार आणि रविवार रात्री ९ वाजता फक्त 'स्टार प्रवाह'वर पाहायला मिळणार आहे.टीआरपीच्या शर्यतीत अग्रेसर राहण्यासाठी सध्या छोट्या पडद्यावरील वाहिन्यांमध्ये जोरदार चढाओढ सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वीच 'झी मराठी' वाहिनीने 'चला हवा येऊ द्या'च्या नव्या पर्वाची घोषणा केली.

# एकदा मूर्ख बनवता आलं असतं!

## दयालच्या अटकेबाबत उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**एका तरुणीचे लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली दाखल झालेल्या एफआयआर प्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने मंगळवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा क्रिकेटपटू यश दयाल याच्या अटकेला स्थगिती दिली आहे. याबाबत लाईव्ह लॉने वृत्त दिले आहे. आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूकडून खेळणाऱ्या यश दयालने लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण केल्याचा आरोप एका तरुणीने केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार, दोघांची सुमारे पाच वर्षांपूर्वी भेट झाली होती, तेव्हापासून ते नातेसंबंधात होते.**



२७ वर्षीय यश दयाल याच्यावर ६ जुलै रोजी गाझियाबाद जिल्ह्यातील इंदिरापुरम पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंडसंहितेच्या कलम ३७६ (फसव्या मार्गाने लैंगिक संबंध इत्यादी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गेल्या आठवड्यात यश दयालने या प्रकरणी उच्च न्यायालयात धाव घेत त्याच्या अटकेला स्थगिती देण्याची आणि त्याच्याविरुद्ध दाखल केलेला एफआयआर रद्द करण्याची मागणी केली होती.अलाहाबाद उच्च न्यायालयात आज झालेल्या सुनावणीदरम्यान, न्यायमूर्ती सिद्धार्थ वर्मा आणि न्यायमूर्ती अनिल कुमार यांच्या खंडपीठाने तोंडी निरीक्षण नोंदवले की, "एखाद्याला पाच वर्षे मूर्ख बनवता येत नाही.""तुम्हाला एक दिवस, दोन दिवस किंवा तीन दिवस मूर्ख बनवता आले असते, पण ५ वर्षे... तुम्ही ५ वर्षांपासून नात्यात आहात, ५ वर्षे कोणालाही मूर्ख बनवता येत नाही", अशी तोंडी टिप्पणी खंडपीठाने केली. याबाबतचे वृत्त लाईव्ह लॉने दिले आहे.पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत तरुणीने आरोप केला आहे की, यश दयालने लग्नाचे खोटे आश्वासन देऊन तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. "त्याने लग्नाचे खोटे आश्वासन देऊन वारंवार माझ्याशी शारीरिक संबंध ठेवले. तसेच त्याच्या कुटुंबीयांशी माझी ओळख करून दिली, ज्यांनी मी त्यांची सून होईन असे आश्वासन दिले. मी पूर्ण प्रामाणिकपणा आणि समर्पणाने हे नाते टिकवले", असे आरोप तरुणीने तक्रारीत केले आहेत.दुसरीकडे यश दयालने तरुणीचे हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. त्यानेही प्रयागराज पोलिसांकडे तरुणीविरोधात तक्रार दाखल केली आहे. याचबरोबर त्याने पोलिसांकडे या प्रकरणी एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे.यश दयालने त्याच्या जबाबात आरोप केला आहे की, या तरुणीने त्याचा आयफोन आणि लॅपटॉप चोरला आहे. याचबरोबर खोट्या बहाण्याने त्याच्याकडून पैसे घेतले आहेत. या सर्व गोष्टींचे त्याच्याकडे पुरावे आहेत.२७ वर्षीय यश दयाल याच्यावर ६ जुलै रोजी गाझियाबाद जिल्ह्यातील इंदिरापुरम पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंडसंहितेच्या कलम ३७६ (फसव्या मार्गाने लैंगिक संबंध इत्यादी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गेल्या आठवड्यात यश दयालने या प्रकरणी उच्च न्यायालयात धाव घेत त्याच्या अटकेला स्थगिती देण्याची आणि त्याच्याविरुद्ध दाखल केलेला एफआयआर रद्द करण्याची मागणी केली होती. अलाहाबाद उच्च न्यायालयात आज झालेल्या सुनावणीदरम्यान, न्यायमूर्ती सिद्धार्थ वर्मा आणि न्यायमूर्ती अनिल कुमार यांच्या खंडपीठाने तोंडी निरीक्षण नोंदवले की, "एखाद्याला पाच वर्षे मूर्ख बनवता येत नाही.""तुम्हाला एक दिवस, दोन दिवस किंवा तीन दिवस मूर्ख बनवता आले असते.

### तरुणीने त्याचा लॅपटॉप चोरला

, पण ५ वर्षे... तुम्ही ५ वर्षांपासून नात्यात आहात, ५ वर्षे कोणालाही मूर्ख बनवता येत नाही", अशी तोंडी टिप्पणी खंडपीठाने केली. याबाबतचे वृत्त लाईव्ह लॉने दिले आहे.पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत तरुणीने आरोप केला आहे की, यश दयालने लग्नाचे खोटे आश्वासन देऊन तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. "त्याने लग्नाचे खोटे आश्वासन देऊन वारंवार माझ्याशी शारीरिक संबंध ठेवले. तसेच त्याच्या कुटुंबीयांशी माझी ओळख करून दिली, ज्यांनी मी त्यांची सून होईन असे आश्वासन दिले. मी पूर्ण प्रामाणिकपणा आणि समर्पणाने हे नाते टिकवले", असे आरोप तरुणीने तक्रारीत केले आहेत.दुसरीकडे यश दयालने तरुणीचे हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. त्यानेही प्रयागराज पोलिसांकडे तरुणीविरोधात तक्रार दाखल केली आहे. याचबरोबर त्याने पोलिसांकडे या प्रकरणी एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे.यश दयालने त्याच्या जबाबात आरोप केला आहे की, या तरुणीने त्याचा आयफोन आणि लॅपटॉप चोरला आहे.

# कसोटी गमावली अन् टेन्शन वाढलं!

## वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय संघ चौथ्या स्थानी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात भारतीय संघाला २२ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला आहे. भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी १९३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना भारताचा संपूर्ण डाव १७० धावांवर आटोपला. भारतीय संघ विजयाच्या जवळ पोहोचला होता, पण सिराजची विकेट पडल्यामुळे भारताचा डाव संपुष्टात आला.**




या पराभवानंतर भारतीय संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेतील गुणतालिकेत चौथ्या स्थानी घसरला आहे.भारतीय संघाला हा सामना जिंकण्याची सुवर्णसंधी होती. पण फलंदाजांच्या फ्लॉप शो मुळे भारताचा पराभव झाला. २२ धावांनी विजय मिळवणारा भारतीय संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. या स्पर्धेत भारतीय संघाने आतापर्यंत ३ सामने खेळले आहेत. यापैकी २ सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. तर एका सामन्यात विजय मिळवला आहे.

### जडेजाने 61 धावांची खेळी केली

भारतीय संघाची विजयाची सरासरी ही ३३.३३ टक्के इतकी आहे. एक सामना जिंकून भारतीय संघाने १२ गुणांची कमाई केली आहे.भारतीय संघासमोर सामना जिंकण्यासाठी १९३ धावांचं आव्हान होतं. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाकडून रवींद्र जडेजाने सर्वाधिक ६१ धावांची खेळी केली. यशस्वी जैस्वाल, करूण नायर, शुबमन गिल आणि नाईट वॉचमन म्हणून आलेला आकाशदीप स्वस्तात माघारी परतला. भारतीय संघासमोर सामना जिंकण्यासाठी १९३ धावांचं आव्हान होतं. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाकडून रवींद्र जडेजाने सर्वाधिक ६१ धावांची खेळी केली. यशस्वी जैस्वाल, करूण नायर, शुबमन गिल आणि नाईट वॉचमन म्हणून आलेला आकाशदीप स्वस्तात माघारी परतला. त्यानंतर पाचव्या दिवशी जोफ्रा आर्चरच्या वेगवान गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाजांनी नांग्या टाकल्या. सर्वात आधी ऋषभ पंत ९ धावांवर त्रिफळाचित होऊन माघारी परतला. त्यानंतर केएल राहुलही ३९ धावांवर माघारी परतला.

महाईन्यूज ™
ePaper
। बुधवार ।
।दि. 16 जुलै 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पीसीसीओईमध्ये शुक्रवारी महिला सबलीकरण कार्यशाळा!

## शिक्षण विश्व: आयुर्वेद आणि मानसोपचार तज्ज्ञ करणार मार्गदर्शन

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड: पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे शुक्रवारी (दि.१८) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रायोजित महिला सबलीकरण व सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी (दि. १८ जुलै) सकाळी १० वाजता, मानसोपचार मार्गदर्शक डॉ. मानसी सोनगीरकर बोराडे आणि आयुर्वेद तज्ञ मार्गदर्शक डॉ. सुप्रिया गुगळे या मार्गदर्शन करणार आहेत. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओई चे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उप संचालक डॉ. निळकंठ चोपडे, कार्यशाळा समन्वयक डॉ. वृषाली भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे.

# रिक्षाचालकाची दोन्ही मुले झाली 'सीए'

## शिक्षण विश्व: दोन्हीही मुलांनी जिद्दीच्या जोरावर यश मिळविले

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**आर्थिक परिस्थितीवर मात करीत जिद्द आणि चिकाटी मेहनत आणि अभ्यासाची तयारी असेल; तर यश मिळविता येते, हे चिंचवड येथील रिक्षाचालक प्रवीण आणि आई दीपा येळवंडे यांच्या दोन्ही मुलांनी सिद्ध केले आहे. त्यांचा मुलगा किरण याने सनदी लेखापाल (सीए) परीक्षेत यश मिळविले. तर, काही दिवसांपूर्वीच किरणचा भाऊ ओंकार यांनीही सीए परीक्षेत यश मिळवत आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे.**




'दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया'च्या वतीने सनदी लेखापाल (सीए) परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. दोन्हीही मुलांनी सीए परीक्षेत यश मिळवल्याने या कुटुंबाचे सर्वत्र कौतुक होत आहे. विशेष म्हणजे, या परीक्षेच्या अभ्यासासाठी या भावंडांनी कोणताही क्लास लावला नव्हता. ओंकार आणि किरण या दोन्हीही भावंडानी मराठी माध्यमातून शिक्षण घेतले. कोणताही क्लास न लावता सेल्फ स्टडीवर जोर देत त्यांनी यश संपादन केले. चिंचवड येथील रिक्षाचालक प्रवीण येळवंडे आणि कुटुंबीय चिखली येथील घरकुल वसाहत येथे वास्तव्यास आहेत. दोघांचे वडील हे गेली ३५ वर्षे रिक्षा चालवत आहेत. तर आई दीपा या गृहिणी आहेत. दोन्हीही मुले सीए झाल्याचे समजताच दोघांनाही आनंदाश्रू अनावर झाले. एका सामान्य कुटुंबातून आलेल्या या दोघा भावंडानी कधीही परिस्थितीला आपले नशीब ठरवू दिले नाही. रात्रंदिवस दीर्घ अभ्यासाने आणि अथक पारिश्रमाने त्यांनी ही प्रतिष्ठित पदवी मिळविली. यामुळे सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### विद्यार्थ्यांनो, परीक्षेला सामोरे जा.

विद्यार्थ्यांनी या स्पर्धेच्या युगात मनात परीक्षेची कोणतीही भीती किंवा न्यूनगंड न बाळगता अभ्यास करावा. कोणतेही यश सहज मिळत नाही, हे लक्षात ठेवावे. इच्छाशक्ती आणि कठोर परिश्रमाची तयारी असेल, तर अपयशला घाबरण्याचे काहीच कारण नाही. या जगात अशक्य काहीच नाही," अशा शब्दांत किरण आणि ओंकार येळवंडे यांनी विद्यार्थ्यांना 'सीए' परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहन केले आहे.

# ‘जीएसटी’ फसवणूक रॅकेटमधील ‘रेहमानी’वर कारवाईचा दणका!

## राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे आश्वासन; भाजपा आमदार महेश लांडगे यांची लक्षवेधी

। मुंबई/ पिंपरी-चिंवचड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवडमधील कुदळवाडी-जाधववाडी येथील दीपक भगत यांना कर्ज देण्याच्या बहाण्याने कागदपत्रे घेतली. त्याच्या आधारे बनावट कंपनी स्थापन केली. त्या कंपनीच्या माध्यमातून बोगस बिले सादर केली आणि इनपूट टॅक्स घेवून सरकारचा करोडो रुपयांचा वस्तू व सेवा कर (GST) बुडवला आहे. सेवा कर गुप्तवार्ता संचालनालयाकडून या प्रकरणाची चौकशी सुरू असली, तरी प्रकरणाची गंभीरता लक्षात घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याची चर्चा करुन गृह विभाग व जीएसटी विभागाकडून आरोपींवर कठोर करावाई करण्यात येईल, असे आश्वासन राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल यांनी दिले.**

जाधववाडी येथे राहणारा मोहम्मद कैश रहमानी याने कर्ज देण्याच्या बहाण्याने दीपक भगत यांची कागदपत्रे घेतली. त्याद्वारे बोगस कंपनी तयार केली. याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. रेहमानी याने आशिया स्टील ट्रेडर्स दुकानाद्वारे कोट्यवधींचा जीएसटी बुडवला आहे. शहरात असे रॅकेट कार्यरत आहे. जे गोरगरिब लोकांची फसवणूक करीत आहे. राष्ट्रविघातक कृत्यांमध्येही त्यांचा सहभाग असल्याचा संशय आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात लक्षवेधी मांडली.




आमदार लांडगे म्हणाले की, मोहम्मद रेहमानी यांने बनावट कंपनी स्थापन केली आणि करोडो रुपयांचा जीएसटी बुडवला. मूळ फिर्यादीवर दबाव आणला आणि जामीनावर हा व्यक्ती बाहेर आहे. अशाप्रकारची फसवणूक अनेक गोरगरीब लोकांची झाली आहे. देशविघात कृत्यांमध्ये हा पैसा वापरला जात असावा, असा संशय आहे. या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करावी आणि संबंधितांवर मोक्काअंतर्गत कारवाई करण्यात यावी. असे रॅकेट पिंपरी-चिंचवडमध्ये कार्यरत आहे, या प्रकरणामध्ये सराईत लोकांचा सहभाग आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे.

> “ गोरगरीब कामगारांच्या कागदपत्रांचा गैरवापर करुन बनावट कंपनी स्थापन करणे आणि त्याआधारे शासनाची जीएसटी बुडवून मोठ्या प्रमाणात फसवणूक करणे, ही गंभीर बाब आहे. सदर प्रकरण केवळ सरकारची फसवणूक यापुरते मर्यादीत नाही. तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असून, देशविघातक कृत्यांमध्ये हा पैसा वापरला असल्याची शक्यता आहे. गृहविभाग, गुप्तचर यंत्रणा यांच्या माध्यमातून सखोल चौकशी करुन कठोर कारवाई करण्यात येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत ‘ब्रीफिंग’ करुन सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय बैठक घेण्यात येईल.
>
> -अॅड. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

### काय आहे प्रकरण?

जाधवावडी येथे राहणारा मोहम्मद कैश रेहमानी याने लोन देण्याच्या बहाण्याने दीपक भगत यांची कागदपत्रे घेतली. त्याद्वारे आशिया स्टील ट्रेडर्स नावाची बनावट कंपनी स्थापन केली. या कंपनीच्या माध्यमातून कशफ ट्रेडिंग कंपनीला बनावट बिले दिली. यामाध्यमातून इनपूट टॅक्स क्रेडिट (ITC) घेवून 9.86 कोटी रुपयांचा जीएसटी बुडवला. केंद्रीय गुप्तवार्ता महासंचालनालय कार्यालय पुणे यांनी चौकशी केली. जीएसटी त्यावरील व्याज आणि शास्ती असा 21.71 कोटी रुपयांच्या रकमेची वसुली करण्याचा आदेश केंद्रीय वस्तू व सेवा कर सहआयुक्त पुणे यांना देण्यात आला.

फसवणूक प्रकरणी आरोपी मोहम्मद कैश रेहमानी आणि मोहमद अहमद उर्फ आदील रेहमानी या दोघांना अटक झाली होती. आरोपी जामिनावर बाहेर आहेत. अटक न झालेला आरोपी अब्दूल मुस्लीम चौधरी याने अटकपूर्व जामिनासाठी मा. सत्र न्यायालय, शिवाजीनगर येथे अर्ज केला असून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.




DNYANVARDHINI PRATISHTHAN’S

VIDYA VALLEY
NORTH POINT COLLEGE

Affiliated to SNDT Women's University

ADMISSIONS
OPEN ONLY FOR GIRLS
B.SC.-IT (120 INTAKE)

Key Features
- Scholarship according to Government norms
- Earn & Learn Schemes
- MOU with industries
- Qualified & Experienced staff

Contact Us
9422537623 / 9422537626

vinfo@vidyavalleynpcollege.edu.in

Plot No. 3, Shivtej Nagar, Chinchwad, Pune, Maharashtra, India - 411 019